शैक्षणिक संस्थांच्या आवारात तंबाखु व
तंबाखुजन्य पदार्थाच्या विक्री बंदीबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण-१११९/(प्र.क्र.६६/१४)/समन्वय
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: ०७ मार्च, २०१५.

<u>वाचा -</u>

१) शासन पत्र क्र. संकीर्ण-१११९/प्र.क्र.६६/१४/समन्वय, दि.२०/०६/२०१४, दि.२७/०६/२०१४ व दि.२८/०८/२०१४.

**शासन परिपत्रक -**

PLI No.९८/२०१३ संदर्भात मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयात तंबाखु नियंत्रण कायदा, २००३ मधील कलम ६ ची अंमलबजावणी राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये करण्याबाबत राज्य शासनास सूचना करण्यात आल्या आहेत. सदर कायद्याच्या कलम ६ नुसार सर्व शैक्षणिक संस्थांपासूनच्या १०० मीटर परिसरात तंबाखु व तंबाखुजन्य पदार्थ विकण्यास मनाई आहे. तसेच कलम ६ च्या नियम ३ नुसार सर्व शैक्षणिक संस्थांच्या प्रमुखाने याबाबत शैक्षणिक संस्थांच्या प्रवेशद्वारावर फलक लावणे बंधनकारक असून, यामध्ये असे नमूद केले असेल की, या शैक्षणिक संस्थेच्या १०० यार्ड परिसरात तंबाखु व तंबाखुजन्य पदार्थ विकण्यास बंदी असून, याचे उल्लंघन करणाऱ्यावर कायद्यानुसार रु.२००/- पर्यंत दंड आकारण्यात येईल.

२. तसेच, राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रमात उच्च शिक्षण विभागाकडून तंबाखु नियंत्रण कायदा, २००३ मधील कलम ४ व ६ नुसार शैक्षणिक संस्थांना सूचना देण्याबाबत तसेच तंबाखुच्या आरोग्यावरील अपायकारक दृष्यपरिणामाबाबतचा मजकुर शैक्षणिक अभ्यासक्रमात समाविष्ट करणेबाबत सूचना करण्यात आल्या आहेत. यासंदर्भात शासन पत्र दि.२०/०६/२०१४ अन्वये योग्य ती पुढील कार्यवाही करून, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याबाबत सर्व संबंधितांना कळविण्यात आले आहे.

३. " World Cancer day " च्या निमित्ताने टाटा मेमोरीयल हॉस्पिटल, परेल, मुंबई येथे दि.०४/०२/२०१५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत मा.मुख्यमंत्री महोदयांनी खालील घोषणा / आश्वासने दिली आहेत. :-

१) शैक्षणिक संस्थांच्या आवारात तंबाखू व तंबाखुजन्य पदार्थ विक्रीबंदीची कठोरपणे अंमलबजावणी करणार.

92386 20/3/15

२) शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना तंबाखुजन्य सेवनाचे दुष्यपरिणामाबाबत माहिती देऊन, युवा पिढीला व्यसनांपासून परावृत्त करण्याकरीता जनजागृती निर्माण केली जाईल.

४. वरील घोषणा /आश्वसन सर्व संबंधितांनी त्यांचे शासकीय /निमशासकीय /खाजगी शिक्षण संस्थांच्या निदर्शनास आणून, त्याचे पालन करावे.

५. या विभागाच्या अधिपत्याखालील सर्व संचालकांनी वरील आदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून, त्यांना त्याबाबत अंमलबजावणी करण्याच्या सूचना तात्काळ द्याव्यात. तसेच याबाबतचा अनुपालन अहवाल दि.१० मार्च, २०१५ पर्यंत शासनास सादर करावा.

६. या विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विद्यापीठांनी मा.मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या वरील घोषणा /आश्वासन त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्थांच्या निदर्शनास आणून, त्यांना त्याबाबत अंमलबजावणी करण्याच्या सूचना तात्काळ द्याव्यात. तसेच याबाबतचा अनुपालन अहवाल दि.१० मार्च, २०१५ पर्यंत शासनास सादर करावा.

७. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०३०७१२३३४१४२०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kamini R Pilankar

Digitally signed by Kamini R Pilankar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Desk Officer, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=791d70f75a8bfaa8349786f02d71cad4fb9d1999ea0d92d63dcf5de198d4f817, cn=Kamini R Pilankar
Date: 2015.03.07 12:43:34 +05'30'

(का.रा.पिळणकर)
कार्यासन अधिकारी

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

२. मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

क्रमांक:-विकाअ/शिक्षण/संकीर्ण/२०१५/ ६३३
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक २३/३/२०१५

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :-१) प्राचार्य, सर्व व्यवसायिक असभ्यासक्रमाच्या सर्व संस्था यांना कळविण्यात येते की, वरील शासन निर्णयाच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

६. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

७. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

८. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

९. संचालक, प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

१०. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

११. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे

१२. सर्व विभागीय शिक्षण सह संचालक, उच्च शिक्षण.

१३. सर्व विभागीय शिक्षण सह संचालक, तंत्र शिक्षण.

१४. सर्व विभागीय उप संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण.

१५. सर्व सह सचिव /उप सचिव /अवर सचिव /कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

१६. निवडनस्ती.